# भुयारी मेट्रो वेग पकडणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३च्या डब्यांची चाचणी मरोळ येथील सारीपुत नगरमध्ये होणार असून, त्यासाठी आता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने पहिल्या ट्रेनच्या आठ डब्यांचे उच्च दाबाने चार्जिंग सुरू केले आहे. आता तात्पुरत्या सुविधेपासून मरोळ मेट्रो स्थानकापर्यंतच्या ३ किलोमीटर लांबीच्या ट्रॅकवर ट्रेनच्या चाचण्या महिन्याच्या अखेरीस केल्या जातील.

प्रत्येक ट्रेनचे चार्जिंग ही रोजची, कधीही न थांबणारी प्रक्रिया आहे. २५ केव्ही-एसी इतक्या उच्च दाबाने ट्रेनचे डबे चार्ज केल्यानंतरच अनेक प्रणाली चाचण्या केल्या जाऊ शकतात. त्यामध्ये वातानुकूलित यंत्रे, संवाद प्रणालीमध्ये सामील असणारे भोंगे, विद्युत यंत्रणा इत्यादींचा समावेश आहे. या सर्व चाचण्या यशस्वी झाल्यानंतरच ट्रेनच्या डिझाईन सिद्ध करणाऱ्या पुढील चाचण्या घेण्यात येतात. श्रीसिटीहून आलेल्या आठ डब्यांची बॅटरी-चलित शटरने यशस्वीपणे जोडणी करण्यात आली आहे. ही जोडणी सारीपुत नगर, आरे येथे ट्रेन डिलिव्हरी आणि चाचणी ट्रॅकसाठी उभारलेल्या तात्पुरत्या सुविधेमध्ये करण्यात आली. बॅटरी-चलित शटर ही मेट्रो कार डेपोसाठी केलेली पहिली खरेदी आहे.